जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -५५०      दिनांक - १५/०७/२०२३**

युनिट-५, गुन्हे शाखा,पुणे शहर

## जबरीने मोबाईल चोरी करणारे चोरटे जेरबंद

दि. १४/०७/२०२३ रोजी गुन्हे शाखा, युनिट-५, कडुन युनिट कार्यक्षेत्रात कोम्बींग ऑपरेशनचे आयोजन केले होते, सदर कोम्बींग ऑपरेशन दरम्यान गुन्हे शाखा, युनिट-५ कडील पथकाला चोरीचे मोबाईल विक्री करणारे आरोपी मगरपट्टा चौक येथे येणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाली.

त्याप्रमाणे युनिट कडील स्टाफने वरिष्ठांच्या आदेशाने मगरपट्टा चौक पुणे येथे सापळा रचुन बातमीतील वर्णनाप्रमाणे इसमांना शिताफीने पकडुन ताब्यात घेतले, त्याचे नाव **हादीहसन सर्फराज इराणी वय २३ वर्षे रा. पाटील इस्टेट, गांधी वस्ती, शिवाजीनगर पुणे व** एक विधी संघर्षीत बालक यांना त्यांचे कब्जात एकुण ९०,०००/-रु.कि.चे एकुण ५ मोबाईल हॅन्डसेट असे असुन त्याबाबत त्यांचेकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात त्यांनी हडपसर, सहकारनगर, कात्रज येथील महिलांचे हातातील मोबाईल हिसकावुन चोरी केले असल्याचे निष्पन्न झाले.

तसेच युनिटकडील तपास पथकाला बातमी मिळालेवरुन इसम नामे **जावेद युसूफअली इराणी, वय-२७ वर्षे, रा. पाटील इस्टेट, महात्मागांधी वसाहत, पाटकर प्लॉट नं. ८, शिवाजीनगर, पुणे** यास एकुण ४०,०००/-रु.कि.चे मोबाईल हॅन्डसेटसह ताब्यात घेऊन त्यांनी मुंढवा, हडपसर व वानवडी येथुन बसमधील व पायी चालणाऱ्या महिलेचे बॅगमधुन मोबाईल चोरी केल्याचे निष्पन्न झाले

वर नमुद आरोपी यांचेकडुन **खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहे**

१. हडपसर पो.स्टे. गु.र.नं. १५४८/२०२२ भा.दं.वि.कलम ३९४,३४
२. हडपसर पो.स्टे. गु.र.नं. ९४९/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४
३. हडपसर पो.स्टे. गु.र.नं. १०३२/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४
४. यवत पो.स्टे, पुणे ग्रामीण गु.र.नं. ४८१/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४
५. भारती विद्यापीठ पो.स्टे. गु.र.नं. ४६७/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४
६. सहकारनगर पो.स्टे. गु.र.नं. १६८/२०२३, भादंवि ३९२
७. मुंढवा पो.स्टे. गु.र.नं. २२७/२०२३ भा.दं.वि.कलम ३७९
८. मुंढवा पो.स्टे., गु.र.नं. ८९६/२०२३ भा.दं.वि.कलम ३७९
९. मुंढवा पो.स्टे. गु.र.नं. ३१५/२०२२ भा.दं.वि.कलम ३७९

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त श्री.रितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त, श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,श्री. रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप आयुक्त, श्री. अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त, श्री. सतिश गोवेकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम, स.पो.नि. कृष्णा बाबर, पोउनि अविनाश लोहटे, चैताली गपाट व पोलीस अंमलदार रमेश साबळे, दया शेगर, प्रमोद टिळेकर,शहाजी काळे, राजस शेख, विनोद शिवले, शशिकांत नाळे,राहुल ढमढेरे, विलास खंदारे, राहुल होळकर यांनी केलेली आहे.